नि.दि.दावा क्र. ४२४/२०१८
किशोर वि. शिवाजी व इतर
निशाणी क्र.३०

## <u>निशाणी क्र.३० खालील आदेशः–</u>
## <u>CNR No.MHLA140009142018</u>

प्रस्तुत अर्ज वादीने उपअधिक्षक, भुमी अभिलेख, औसा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून मौजे उत्का ता.औसा जि. लातूर येथील जमीन स.न. ७६ मधील वादीच्या नावे असलेली जमीन क्षेत्र १ हे ९९ आर. या वादीच्या मिळकतीचे निरीक्षण/मोजणी करुन नकाशा व अहवाल दाखल करण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक होण्यासाठी केला आहे.

२. वादीचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, मौजे उत्का ता.औसा जि. लातूर येथील जमीन स.न. ७६ मधील वादींच्या नावे असलेली जमीन क्षेत्र १ हे ९९ आर. आहे. प्रतिवादी क्र. १ ते ७ हे वादी नं. १ व २ यांचे शेतशेजारी आहेत. प्रतिवादी क्र. १ हे वादी नं. १ व २ च्या जमिनीच्या पुर्वेकडील व उत्तरेकडील बाजूचे शेतशेजारी,प्रतिवादी क्र. ७ हे वादी नं. १ व २ च्या जमिनीच्या पश्चिमेकडील बाजूचे शेतशेजारी आहेत. प्रतिवादी क्र.१ ते ७ यांनी त्यांच्या व वादीच्या शेतामधील पुर्व व पश्चिम बाजुने बांध काही अंशी नष्ट करुन वादींच्या जमीनीवर अतिक्रमण केले आहे. त्यावर वादींनी प्रतिवादीस जमिन मोजणीस विचारणा केली असता प्रतिवादींनी त्यास टाळाटाळ केली व न्यायालयातुन मोजणी केल्याशिवाय ताबा देण्यास नकार दिला. म्हणुन वादीने मोजणी करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त नेमणुकीची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांना वेळोवेळी संधी देऊनही प्रतिवादींनी सदर अर्जाचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे अर्ज प्रतिवादींच्या म्हणण्या विना पुढे चालविण्यात आला.

४. वादी तर्फे विधिज्ञ श्री एस.डी. भाग्यवान यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादींनी वादीच्या शेजजमिनीवर अतिक्रमण केले आहे व प्रतिवादी क्र.१ ते ७ यांनी

त्यांच्या व वादीच्या शेतामधील बांध काही अंशी नष्ट करुन वादीच्या शेतावर अतिक्रमण केले आहे. त्यामुळे वादीच्या मिळकतीची मोजणी होणे आवश्यक आहे. प्रतिवादीतर्फे कोणीही हजर नाही.

५. अतिक्रमण व अतिक्रमीत जमीनीचा ताबा मिळणेबाबतच्या दाव्यात उभयतांना मान्य नकाशा किंवा आयोगाचा अहवाल व नकाशा अटळ आहे. वादीने त्याच्या मिळकतीची मोजणी होऊन नकाशा व अहवाल मिळविण्याची मागणी केली आहे. वादी आणि प्रतिवादी यांचा वाद शेतजमीन मिळकतीबाबत आहे असे दिसते. म्हणुन तज्ञांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करुन मोजणी करुन नकाशा व अहवाल प्राप्त केल्याशिवाय वाद संपणार नाही असे दिसते.

६. म्हणून उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, औसा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करण्यासाठी वादीने आयुक्ताचा खर्च देण्याच्या अटीवर वादाचे पुर्ण निराकरण करण्यासाठी अहवाल व नकाशा दाखल करण्यासाठी करणे न्यायाचे होईल.

७. उभयतांनी त्याचे मालकीहक्काचे दस्ताऐवजासह ते ज्या महसुल किंवा इतर कागदपत्रांवर भरवसा ठेवतात अशा कागदपत्रांच्या २ प्रमाणित/सत्यप्रती, एक न्यायालयासाठी, १ न्यायालयीन आयुक्तांना देण्यासाठी व १ छायांकीत प्रत विरुध्द पक्षांना देण्यासाठी दाखल करण्याचा आदेश देणे उचित होईल. म्हणुन खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. वादींचा अर्ज **निशाणी क्र. ३०** मंजूर करण्यात येतो.

२. **दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम २६ नियम ९ सह वाचणीय कलम ७५ (ब)** नुसार उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, औसा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून मौजे उत्का ता.औसा जि. लातूर येथील जमीन स.न. ७६ मधील वादी क्र.

१ च्या नावे असलेली जमीन क्षेत्र १ हे ९९ आर. व वादी क्र. २ च्या नावे ३३ आर क्षेत्राचे निरीक्षण करुन आयुक्त पत्र मिळाल्यापासुन २ महिन्याच्या आत नकाशा काढून नकाशा व अहवाल दाखल करण्यासाठी नेमणुक करण्यात येते.

३. वादींनी उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, औसा यांच्या कार्यालयात त्यांच्या सुचनेनुसार आवश्यक शुल्क नियमाप्रमाणे अदा करावे व आयुक्त पत्र विनाविलंब जारी करण्यासाठी शुल्क पावतीची सत्य प्रत अभिलेखावर दाखल करावी.

४. वादींना ते ज्या मालकी हक्क दस्तऐवज व महसुल आणि इतर कागदपत्रावर भरवसा ठेवतात अशा कागदपत्रांच्या २ प्रमाणित/सत्यप्रती व १ छायांकीत प्रत दाखल करण्याचा निर्देश देण्यात येतो.

५. आयुक्ताला दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ७५ ते ७८ क्रम २६ व अंतर्गत नियम तसेच दिवाणी प्रक्रिया नियमावलीतील प्रकरण क्र.८ परिच्छेद १५१ ते १७० व महसुल नियमातील आवश्यक नियमांचा अवलंब करुन आयुक्ताचे कार्य सत्वर पुर्ण करण्याचे व मोजणी नकाशा व अहवाल दाखल करण्याचे निर्देशित करण्यात येते. आयुक्ताचे काम काही अपरिहार्य कारणामुळे ठरवुन दिलेल्या मुदतीत पुर्ण होऊ शकले नाही तर न्यायालयीन आयुक्त उपरोक्त मुदत संपण्यापुर्वी न्यायालयाकडे लेखी अर्ज करुन मुदत वाढ मागु शकतात.

६. उभय पक्षांना जातीने अथवा विधिज्ञांमार्फत न्यायालयीन आयुक्ताने नेमलेल्या तारखेला व वेळी हजर राहण्याचे निर्देशित करण्यात येते.

७. न्यायालयीन आयुक्ताला उभय पक्षांना आयोगाचा ठरलेला दिवस, तारीख व वेळेची सुचना वादपत्राच्या सरनाम्यातील

पत्त्यांवर नोटीसा काढून कळविण्याबाबत निर्देशित करण्यात येते. वादीला वादपत्र व कैफीयतीच्या प्रमाणित प्रती न्यायालयीन आयुक्ताला आयोगाचे स्वरुप व हेतूचे अकल होण्यासाठी देण्याचे निर्देशत करण्यात येते.

८. जर आयोगाच्या ठरलेल्या दिवशी, तारखेला व वेळी कोणताही पक्ष गैरहजर राहिल्यास न्यायालयीन आयुक्तांनी तसा पंचनामा करुन आयोगाचे कार्य उपस्थित पक्षकारांसमक्ष पुर्ण करावे.

९. वादीने आदेश कलम ३, ४ आणि ७ ची पुर्तता तात्काळ करावी.

१०. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात येतो.

स्वाक्षरीत /–

औसा. **(के.के. वाघमारे)**

दिनांकः– ०१/०२/२०२३ ३रे सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर., औसा.